MAHAVITARAN
E-mail : managerpom@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

HRD/O&M/F.No.02-B/
Maharashtra State Electricity Distribution Company Ltd.
Estrella Batteries Expansion Building,
Ground Floor, Plot No. 1, Dharavi Road
Matunga, Mumbai – 400 019.
Telephone No. : 022-24077441
Fax No. : 022-24025763

# CORRECTION SLIP NO. 46 DATE 19/11/2019

**(To MSEDCL Employees' Service Regulations-2005)**

**SUB : Revised provisions of STUDY LEAVE.**

The Board of Directors vide its **Resolution no. 1890 Dt. 11.09.2019** has accorded approval to revise and replace the existing provisions of Study Leave with new provisions.

2. The revised provisions of Twenty Fifth Schedule appended to MSEDCL Employees' Service Regulation- 2005 i.e. STUDY LEAVE are attached as **'Annexure-A'** to this Correction Slip.

3. This Correction Slip shall come into force with immediate effect.

4. This Correction Slip is made available on Company's **e-Library**.

Encl. - **Annexure-A**

**(Cdr. Shivaji Indalkar)** ***(Retd)***
**Chief General Manager (HR)**

**ANNEXURE – 'A'**

# TWENTY FIFTH SCHEDULE

## STUDY LEAVE

**1. Study Leave:**

Subject to the conditions specified, study leave may be granted to an employee with due regard to the exigencies of public service to enable him to undergo, in or out of India, a special course of study consisting of higher studies or specialised training in a professional or a technical subject having a direct and close connection with the sphere of his duty.

**2. Study leave shall be granted:**

**(a)** Granted only if sponsored by the company for courses terminating into grant of recognized degree / diploma or any such equivalent degree and its usefulness to the company.

**(b)** Can be sponsored within and Outside India.

**(c)** Approval shall be at the discretion of the Competent Authority and the decision of the Competent Authority regarding the admissibility of the study leave shall be final.

**(d)** Cost of Course fees will be borne by the Company. Amount of Scholarship / Outsider Sponsorship, etc., if any, will be deducted accordingly.

(e) **Unsponsored Study Leave will be treated as Lien Leave and will attract its provisions.**

**3. Study leave shall not be granted unless:**

**(a)** It is certified by the authority competent to grant leave that the proposed course of study or training shall be of definite advantage from the point of view of Company's interest.

**(b)** The release of foreign exchange involved in the grant of study leave, if such study is outside India shall be in accordance with the R.B.I. Rules prevailing from time to time.

**(c)** The Study leave out of India shall not be granted for the studies in subjects for which adequate facilities exist in India.

4. **Minimum and Maximum Service & Age Limit:**

(a) Who has rendered minimum five (05) years' service under the Company on regular post excluding Contractual / Trainee period;

(b) Maximum age limit to apply for this leave will be **45 years**.

(c) The Competent Authority may relax the maximum age limit considering the duration and content of the course.

5. **Period of Study leave:**

The period of study leave, which may be granted to an employee, shall be –

(a) For the duration of the Course (no minimum limit) subject to a Maximum of 24 months.

(b) In exceptional cases, duration may be extended up to 01 year by the Competent Authority.

(c) The limit mentioned above includes the period of vacations, if any.

6. **Applications for Study leave:**

(a) Every application for the study leave shall be submitted through proper channel to the authority competent to grant leave in the **APPLICATION FORM –'A'** attached herewith.

(b) The course or courses of study contemplated and any examination, which he proposes to undergo, shall be clearly specified in such application.

7. **Amount and Period of Surety Bond:**

(a) Every employee who has been granted study leave or extension of such study leave shall be required to execute a surety bond in **FORM - I or FORM - II** as the case may be, before the study leave or extension of such study leave granted to him commences.

(b) Surety Bond will commence from the date of proceeding on leave and will remain in force for 05 years after re-joining the company after availing study leave.

(c) **The amount of Surety Bond will include**:- The complete expenditure which shall include salary, course fees, TA/DA, HRA, Hostel Fees or Accommodation charges and any other monetary expenses incurred by the company.

(d) In case employee wishes to resign or takes VRS from MSEDCL's service prematurely, the amount mentioned in surety bond will be recovered with 12% p.a. interest.

(e) The Competent Authority, on due recommendation of a medical board and at his discretion, can waive off the amount mentioned in surety Bond & interest thereon referred to in clause 7(b), 7(c) and 7(d) in serious medical cases of incapacitation / death of an employee himself.

8. **Travelling allowance during Study leave:**

(a) Employee proceeding on leave will be eligible only for *to & fro* travelling allowance.

(b) Recovery of travelling allowance will be affected if the employee re-joins before successful completion of the approved Course.

9. **Effect on Seniority and Promotion:**

(a) Seniority of employee proceeding on leave shall be protected.

(b) Employee will become eligible for promotion in the first held panel after returning from study leave, as per his seniority, after attaining required period of experience in the Feeder Category and considering his conduct during leave period.

(c) Employee proceeding on leave will not be considered for promotion during the period of study leave but will be eligible for grant of Deemed Date, if he fulfills the necessary promotion criteria and is selected so by the Competent selection Committee.

10. **Counting of Experience in Direct Recruitment:**

Period of Study Leave will be counted as Experience for Direct Recruitment.

11. **Financial Benefit to the employee:**

(a) Period of study leave will be treated as service period.

(b) The employee will be eligible for increments which fall due in the period of Study leave and also salary along with all allowances, if any.

(c) Period of study leave will be counted for all retirement benefits like Gratuity, CPF and Leave Encashment as applicable from time to time.

(d) In case of HGB, the employee will become eligible for HGB after re-joining from Study leave w.e.f. its due date.

(e) In case of courses outside India, the expenditure incurred on Medical Insurance will be borne by the Company to a maximum of three times the amount covered while in the Company in India; excluding Top Up amount, if any.

## 12. Retention of Quarters:

The employee will be eligible for retention of quarter during the period of Study Leave.

## 13. Disciplinary Action :

**(a)** Study Leave shall not be sanctioned if any kind of Disciplinary Action under Acts of Misconduct of Schedule "B" of Service Regulation- 86(3) is contemplated or is on-going.

**(b)** The employee / officer will submit an undertaking to that effect as to point no. 13(a).

**(c)** Confirmation / NOC are to be obtained by CGM (HR) / CGM (T/E) from S&E Dept., CIO, DC Cell and EVC before approving Study Leave.

## 14. Dues towards the company:

**(a)** Before proceeding on study leave the employee / officer will have to refund all kinds of monetary dues / advances drawn including fines charged under disciplinary action as per SR 91.

**(b)** On-going punishment before proceeding on leave, if any; will be continued during the study leave.

## 15. Re-joining after availing leave:

**(a)** The employee / officer will be required to re-join the company a day after expiry of study leave.

**(b)** In exceptional circumstances study leave period may be extend by 30 days with prior approval of the Competent Authority. Extended period of up to 30 days can be regularized and to be treated as Extra Ordinary Leave (EOL).

**(c)** If the employee / officer fails to re-join on expiry of study leave or within the extended period, he shall be liable for Termination of Service with recovery of all financial dues if any. Necessary legal action for recovery of financial dues, as deemed fit, shall be initiated if required.

**(d)** For this provision, the Director (HR) / Executive Director (HR) will act as Competent Authority, as the case may be.

16. **Joining before successfully completion of course:**

(a) The employee will be allowed to join but will not be eligible for any pay until he joins at the detailed posted place.

(b) In case of no vacancy employee may be allowed to join by creating surplus post temporarily.

(c) On reaching the last date of sanctioned Study Leave Period, employee will automatically become eligible for pay and allowance, as per the prevailing rules.

(d) All the expenditure incurred on the course and employee will be recovered. (Leave Salary and allowances amount + Course Fees + expenditure on Medical Insurance + TA/DA+ Hostel Fees or Accommodation charges + Any other expenditure [excluding amount incurred on Surety Bond] incurred by the company will be recovered with 12% p.a. interest)

(e) In case of unsuccessful completion, the availed study leave period will be converted into Lien Leave and and will attract provisions of Lien Leave.

(f) Authority sanctioning the study leave will be Competent Authority to take above action.

(g) Competent Authority may waive off the conditions 16 (d) & 16 (e) above in case of exceptional medical reasons of self and close family members which may prevent employee from completing the course.

17. **In case of death / termination on Medical Ground during Study Leave:**

The employee / officer will be governed by the rules of Compassionate Ground Scheme in force from time to time.

18. **Maintenance / Custody of Service Book:**

The service book shall be maintained by the office of the last Drawing & Disbursing Officer of the employee / officer before proceeding on study leave.

19. **Annual Confidential Reports of Subordinate staff & Individual's themselves:-**

(a) The employee / officer proceeding on study leave shall endorse all ACR's in capacity of Reporting, Reviewing, Countersigning and Accepting Officer before proceeding on study leave.

(b) The employee / officer proceeding on study leave will not be entitled for his ACR during the period of study Leave.

- **Competent Authority For Sanctioning Study Leave :-**

➢ **NINTH SCHEDULE :: GRANT OF LEAVE**

**E: STUDY LEAVE**

| SNO | Pay Group | Competent Authority |
|---|---|---|
| (i) | All Employee | **Chairman & Managing Director** |

***********

**FORM - I**

## Surety Bond to be executed by an employee when proceeding on study leave

(Non-Judicial Bond on Stamp Paper amounting to 0.5% of the amount secured)

KNOW ALL MEN BY THESE PRESENTS THAT I, ...................................... resident of ....................... in the District of ................ at present employed as .............. in the Department / Office of ................. do hereby bind myself and my heirs, executors and administrators to pay to the MSEDCL (hereinafter called as the Company) on demand the sum of Rs............. (Rupees ............... .............. only) *(amount should include - Leave Salary amount + Cost of Course Fees + Expenditure on Medical Insurance + TA/DA + HRA+ Any other expenditure)* together with 12% p.a. interest thereon from the date of proceeding on study leave, if payment is made in a country other than India, the equivalent of the said amount in currency of that country converted at the official rate of exchange between that country and India, AND TOGETHER with all costs between attorney and client and all charges and expenses that shall or may have been incurred by the Company.

WHEREAS I, ................................. am granted study leave by the Company:

AND WHEREAS for the better protection of the Company, I have agreed to execute this surety bond with such condition as hereunder is written:

NOW THE CONDITION OF THE ABOVE WRITTEN OBLIGATION IS THAT, in the event of my failing to resume duty or resigning or retiring (VRS) from service or otherwise quitting service without returning to duty after the expiry or termination of the period of study leave or at any time within a period of five years after my return to duty, I shall forthwith pay to the Company or as may be directed by the Company on demand the said sum of Rs. .......... (Rupees ....................... only) together with interest thereon from the date of proceeding on study leave.

AND upon my making such payment the above written obligations shall be ineffective, otherwise it shall be and remain in full force and virtue.

The surety bond shall in all respects be governed by the laws of India, for the time being in force and the rights and liabilities hereunder shall where necessary be accordingly determined by the appropriate courts in India.

The Company have agreed to bear the stamp duty payable on this surety bond.

Signed and dated this .......... day of .......... two thousand and ............

Signed and delivered by ............... in the presence of .........................

Witness :

(1) ............................

(2) ............................

.............................................
(Name & Signature of Surety / Employee)

.....................................
(Name, Signature & Designation of officer
Accepting for and on behalf of MSEDCL)

**FORM - II**

## Surety Bond to be executed by an employee for extension of study leave

(Non-Judicial Bond on Stamp Paper amounting to 0.5% of the amount secured)

KNOW ALL MEN BY THESE PRESENTS THAT I, ........................... resident of ................. in the District of ................ at present employed as .............. in the Department/Office of ................. do hereby bind myself and my heirs, executors and administrators to pay to the MSEDCL (hereinafter called as the "Company") on demand the sum of Rs............. (Rupees .............. .............. only) *(amount should include - Leave Salary amount + Cost of Course Fees + Expenditure on Medical Insurance + TA/DA + HRA+ Any other expenditure)* together with 12% p.a. interest thereon from the date of proceeding on study leave, if payment is made in a country other than India, the equivalent of the said amount in currency of that country converted at the official rate of exchange between that country and India, AND TOGETHER with all costs between attorney and client and all charges and expenses that shall or may have been incurred by the Company.

WHEREAS I, .................................. am granted study leave by Company for the period from ............ to ............. in consideration of which I executed a bond, dated ............. for Rs. ............. (Rupees ............................ only) in favour of the Company.

AND WHEREAS the extension of study leave has been granted to me at my request until ...............

AND WHEREAS for the better protection of the Company, I have agreed to execute this bond with such condition as hereunder is written.

NOW THE CONDITION OF THE ABOVE WRITTEN OBLIGATION IS THAT, in the event of my failing to resume duty or resigning or retiring (VRS) from service or otherwise quitting service without returning to duty after the expiry or termination of the period of study leave or at any time within a period of five years after my return to duty, I shall forthwith pay to the Company or as may be directed by the Company on demand the said sum of Rs. .......... (Rupees ...................... only) together with interest thereon from the date of proceeding on study leave.

AND upon my making such payment the above written obligation shall be in effective, otherwise it shall be and remain in full force and virtue.

The surety bond shall in all respects be governed by the laws of India, for the time being in force and the rights and liabilities hereunder shall where necessary be accordingly determined by the appropriate courts in India.

The Company have agreed to bear the stamp duty payable on this bond.

Signed and dated this .......... day of .......... two thousand and .................

Signed and delivered by ............... in the presence of ...........................

**Witness :**

(1) ...........................

(2) ...........................

............................................
(Name & Signature of Surety / Employee)

....................................
(Name, Signature & Designation of officer
Accepting for and on behalf of MSEDCL)

**FORM – 'A'**

## Application Form For Study Leave

**To,**

______________________________
______________________________
______________________________

**(Thrg:-** The ____________________________
M.S.E.D.C.L., __________________ )

**Sir,**

I, the undersigned hereby apply for Study Leave for acquiring the Course in ____________________________________________ studies.

1. Details of Course are as below:-

   a) Name of the Institute : ______________________________

   b) Name of the Course : ______________________________

   c) Address of the Institute : ______________________________

   d) Period of Course : From Dt. __________ To__________
   (Total Period of Study Leave --Year/s – Months, including vacations)

2. Following particulars in this connection are furnished as required:-

   1. Name of Applicant : ______________________________

   2. Designation : ______________________________

   3. C.P.F. No. : ______________________________

   4. (a) Place of working : ______________________________

      (b) Sub-Division : ______________________________

      (c) Division : ______________________________

      (d) Circle : ______________________________

      (e) Zone : ______________________________

5. (a) Date of Joining in the service : ____________________

(b) Completed years of service as on the date of application : ____________________

6. (a) Date of Birth : ____________________

(b) Age on the date of Application: __________ Yrs. __________ Months

(c) Date of Retirement : ____________________

(d) No. of years of service remained : ____________________

7. (a) Basic Pay : ____________________

(b) Pay scale : ____________________

**UNDERTAKING**

The above information given by me is true and correct as per my knowledge. I hereby agree to abide by the prescribed conditions and undertake:

(i) I shall abide by the Company's Rules and Regulations which are in force and which may be amended from time to time on this issue,

(ii) There is no Disciplinary Action Case/ ACB/ Criminal Case is pending or contemplated against me.

(iii) I will refund all the dues towards Company, before proceeding on leave.

(iv) I will return copy of Course material to the respective controlling authority within a month after re-joining from of Study Leave.

Yours faithfully,

..............................

(Name & Signature of Applicant)

Date : __________

Place : __________

[FOR OFFICE USE ONLY]

The details furnished by the applicant have been verified and are correct.

Signature of Forwarding Authority: ____________

Designation of Forwarding Authority: ____________

(Not below the rank of Executive Engineer)

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.२-ब/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# सुधारपत्र क्र. ४६ दिनांक १९ / ११ / २०१९

**(म.रा.वि.वि.कं.मर्या., कर्मचारी सेवाविनियम २००५)**

**विषय : अध्ययन रजेच्या सुधारीत तरतुदी.**

संचालक मंडळाने ठराव क्र. १८९० दि. ११.०९.२०१९ अन्वये, अध्ययन रजेच्या विद्यमान तरतुद सुधारीत आणि पुन:स्थापीत करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

२. म.रा.वि.वि.कं.मर्या., कर्मचारी सेवाविनियमांतील पंचविसावी अनुसूची तथा अध्ययन रजेच्या सुधारीत तरतुदी 'जोडपत्र अ' प्रमाणे या सुधारपत्रासोबत पारीत करण्यात आलेल्या आहेत.

३. सदरचे सुधारपत्र जारी केल्याच्या तारखेपासून लागू राहील.

४. सदर सुधारपत्र कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत: जोडपत्र -'अ'

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

जोडपत्र - 'अ'

# पंचविसावी अनुसूची

## अध्ययन रजा

**१. अध्ययन रजा:**

विहित शर्तींच्या अधीन राहून कर्मचाऱ्यास, त्याला सेवा कार्यकालात करावयाच्या असलेल्या सार्वजनिक कामांची निकड लक्षात घेऊन भारतात किंवा भारताबाहेर उच्च शिक्षणाचा अंतर्भाव असलेल्या विशेष पाठ्यक्रमाच्या अध्ययनासाठी किंवा, व्यावसायिक तांत्रिक विषयातील वैशिष्ट्यपूर्ण प्रशिक्षणासाठी जाण्याकरिता अध्ययन रजा मंजूर केली जाईल; मात्र त्या अध्ययनाचा किंवा प्रशिक्षणाचा तो करीत असलेल्या कामाशी थेट व निकटचा संबंध असला पाहिजे.

**२. अध्यन रजा मंजूरीबाबत:**

(क) जे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मान्यताप्राप्त पदवी/ पदविका किंवा अशाप्रकारची कोणतीही समकक्ष पदवी प्राप्त होणार असेल आणि कंपनीसाठी उपयोगी असेल अशा अभ्यासक्रमासाठी केवळ कंपनीकडून पुरस्कृत करण्यात आल्यास.

(ख) देशांतर्गत आणि भारताबाहेरील अभ्यासक्रमासाठी मंजूर करण्यात येईल.

(ग) रजा मंजुरीबाबत सक्षम अधिकारी यांना स्वेच्छानिर्णय अधिकार असतील.

(घ) अभ्यासक्रमाची फी कंपनीकडून अदा करण्यात येईल. शिष्यवृत्ती / कंपनी व्यतीरिक्त पुरस्कर्ता इत्यादी बाबीप्रकरणी अनुषंगीक रक्कम कपात करण्यात येईल.

(च) **कंपनी पुरस्कर्ता नसल्यास अध्ययन रजा ही धारणाधिकार रजा समजण्यात येईल आणि त्याबाबतच्या तरतुदी लागू होतील.**

**३. खालील बाबीखेरीज अध्ययन रजा मंजूर केली जाणार नाही:**

(क) प्रस्तावित अभ्यासक्रम किंवा प्रशिक्षण, कंपनीच्या हिताकरीता निश्चीत स्वरूपात लाभदायक असल्याचे सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक.

(ख) भारताबाहेरील अध्ययनाकरीता परदेशी चलन मंजूर करावे लागल्यास आर.बी. आय. च्या प्रचलित नियमांनुसार पूर्तता करणे आवश्यक.

(ग) एखाद्या अभ्यासक्रमाबाबत भारत देशामध्ये परिपूर्ण सुविधा उपलब्ध असल्यास भारताबाहेर अशा अभ्यासक्रमासाठी अध्ययन रजा मंजूर केली जाणार नाही.

**४. किमान व कमाल सेवा आणि वयोमर्यादा:**

(क) कंत्राटी/ प्रशिक्षणार्थी कालावधी वगळता नियमित पदावर कंपनीमध्ये कमीतकमी पाच(०५) वर्षे सेवा पूर्ण करणे आवश्यक.

(ख) या रजेसाठी अर्ज करण्याकरीता उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

(ग) अभ्यासक्रमाचा कालावधी आणि वस्तूविषय विचारात घेता सक्षम अधिकारी उच्चतम वयोमर्यादेमध्ये सवलत देउ शकतील.

**५. अध्ययन रजेचा कालावधी:**

अध्ययन रजेचा कर्मचाऱ्यास मंजूर करण्यात येणारा जास्तीतजास्त कालावधी खालीलप्रमाणे असेल-

(क) अभ्यासक्रमाच्या कालावधी इतका (कमीत कमी कालावधीची मर्यादा नाही) अथवा जास्तीतजास्त २४ महिने कालावधी असण्याच्या अटीवर

(ख) अपवादात्मक परिस्थितीमध्ये सक्षम अधिकारी ०१ वर्षापर्यंत कालावधी वाढवू शकतील.

(ग) सदर कालावधीमध्ये सुट्टया असल्यास उपरोक्त मर्यादेमध्ये त्यांचा समावेश असेल.

६. **अध्ययन रजेसाठी अर्ज करणे:**

(क) अध्ययन रजेचा प्रत्येक **अर्ज हा सोबत जोडलेल्या प्रपत्र -अ मध्ये** योग्य मार्गे सक्षम अधिकारी यांना करणे आवश्यक आहे.

(ख) योजलेल्या अध्ययनाचा अभ्यासक्रम आणि त्याबाबतच्या परीक्षा, याचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये असणे आवश्यक आहे.

७. **हमीपत्र ची रक्कम आणि कालावधी:**

(क) अध्ययन रजेवर जाणाऱ्या अथवा रजेमध्ये वाढ हवी असणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यास रजेवर जाण्यापूर्वी प्रकरणपरत्वे Form I or Form II मध्ये हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(ख) हमीपत्र हे रजेवर जाण्याच्या दिनांकापासून लागू राहील आणि लागू असण्याचा कालावधी रजा उपभोगल्यानंतर कंपनीमध्ये पुन:श्च रूजु झाल्यापासून ०५ वर्षांपर्यंत अस्तित्वात असेल.

(ग) **हमीपत्रामध्ये पुढील रकमांचा समावेश असेल:-** एकूण खर्च ज्यामध्ये वेतन, अभ्यासक्रम शुल्क, प्रवास भत्ता/ दैनिक भत्ता, घरभाडे भत्ता, वस्तीगृह शुल्क अथवा घरभाडयाची रक्कम आणि कंपनीकडून करण्यात आलेला इतर खर्च याचा समावेश असेल.

(घ) कर्मचारी जर कंपनीच्या सेवेचा राजीनामा देउ इच्छित असल्यास अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणार असल्यास हमीपत्रामध्ये नमूद केलेली रक्कम १२% प्रतिवर्ष दराने कर्मचाऱ्याकडून वसूल करण्यात येईल.

(च) कर्मचाऱ्याचा मृत्यू/ अत्यंत गंभीर वैद्यकीय प्रकरणी/ कर्मचाऱ्यास असमर्थ ठरविण्यात आल्यास, वैद्यकीय मंडळाच्या शिफारसीनुसार सक्षम अधिकारी स्वेच्छानिर्णय अधिकाराने वरील क्र. (ख), (ग) आणि (घ) च्या अनुषंगाने हमीपत्रामध्ये नमूद केलेली रक्कम माफ करू शकतील.

८. **अध्ययन रजा कालावधीमधील प्रवासभत्ता:**

(क) अध्ययन रजेवर जाणारा कर्मचारी जातेवळी व परत येईल त्यावेळी फक्त प्रवासभत्ता मिळण्यास पात्र असेल.

(ख) अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यापूर्वीच कर्मचारी पुन:श्च रूजू झाल्यास प्रवासभत्याची रक्कम त्याच्याकडून वसूल करण्यात येईल.

९. **सेवाज्येष्ठता आणि पदोन्नतीवर होणारा परिणाम:**

(क) अध्ययन रजेवर जाणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता संरक्षित राहील.

(ख) कर्मचारी अध्ययन रजेवरून परत आल्यानंतर, प्रथम निवड समिती बैठकीमध्ये त्याची सेवाज्येष्ठता, सध्याच्या पदावरचा आवश्यक अनुभव आणि रजेच्या कालावधीमधील वर्तणूक यानुसार तो पदोन्नतीसाठी पात्र होईल.

(ग) अध्ययन रजा कालावधीमध्ये कर्मचाऱ्याचा पदोन्नतीसाठी विचार केला जाणार नाही तथापी कर्मचारी पदोन्नतीचे आवश्यक निकष पूर्ण करीत असल्यास आणि सक्षम निवड समितीकडून त्याची निवड करण्यात आल्यास तो मानीव तारीख मिळण्यास पात्र असेल.

१०. **सरळसेवा भरतीकरीता अनुभव गणना करणे:**

अध्ययन रजेचा कालावधी सरळसेवा भरतीकरीता अनुभव म्हणून गणला जाईल.

११. **कर्मचाऱ्यास मिळणारे आर्थिक लाभ:**

(क) अध्ययन रजेचा कालावधी सेवाकालावधी म्हणून समजण्यात येईल.

(ख) अध्ययन रजा कालावधीमध्ये कर्मचारी, सामान्यत: देय असणारी वार्षिक वेतनवाढ आणि भत्त्यांसह रजावेतन मिळण्यास पात्र असेल.

(ग) सेवानिवृत्तीपश्चात प्रचलित नियमांनुसार मिळणारे, उपदान, भनिनि, रजा रोखीकरण करीता अध्ययन रजेचा कालावधी गणला जाईल.

(घ) उच्च वेतनश्रेणी लाभ प्रकरणी कर्मचारी अध्ययन रजेवरून परत आल्यानंतर देय तारखेपासून उच्च वेतनश्रेणीचा लाभ मिळण्यास पात्र असेल.

(च) भारत देशाबाहेरील अभ्यासक्रम प्रकरणी, वैद्यकीय विम्याबाबत कंपनीकडून करण्यात येणाऱ्या खर्चाची रक्कम ही भारत देशामध्ये असतांना, अव्वल रक्कम वगळता लागू असणाऱ्या क्षतितारण रकमेच्या (Covered Amount) जास्तीतजास्त तिप्पट असेल.

**१२. निवासी गाळयाचा ताबा:**

अध्ययन रजेच्या कालावधीमध्ये कर्मचारी निवासी गाळा ताब्यात ठेवण्यास पात्र असेल.

**१३. शिस्तभंग कारवाई:**

(क) अनुसूची 'ख' सेवाविनियम ८६(३) अनुसार गैरवर्तणूकीबाबत कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई सुरू अथवा विचाराधीन असल्यास कर्मचाऱ्यास अध्ययन रजा मंजूर करण्यात येणार नाही.

(ख) कर्मचारी/ अधिकाऱ्यास वरील अनुक्रमांक १३ (क) च्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक असेल.

(ग) मुख्य महाव्यवस्थापक (मासं)/ मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ) हे अध्ययन रजा मंजूर करण्यापूर्वी, सुरक्षा व अंमलबजावणी विभाग, मुख्य तपास अधिकारी, शिस्तभंग नियंत्रण कक्ष आणि उर्जा दक्षता समिती यांच्याकडून खात्री / ना हरकत प्रमाणपत्र घेतील.

**१४. कंपनीस देय असणारी रक्कम:**

(क) अध्ययन रजेवर जाण्यापूर्वी कर्मचारी / अधिकाऱ्याने कंपनीस देय असणारी सर्व प्रकारची देयके/ अग्रीम रक्कम तसेच शिस्तभंग कारवाई अंतर्गत सेवा विनियम ९१ नुसार ठोठावण्यात आलेली दंडाची रक्कम कंपनीकडे जमा करणे आवश्यक असेल.

(ख) अध्ययन रजेवर जाण्यापूर्वी सुरू असणारी शिक्षा अध्ययन रजेच्या कालावधीमध्ये देखील सुरू राहील.

**१५. रजा संपल्यानंतर रूजू होणे:**

(क) अध्ययन रजा संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी कर्मचारी /अधिकाऱ्याने कंपनीच्या सेवेत रूजू होणे आवश्यक आहे.

(ख) अपवादात्मक परिस्थितीमध्ये सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीने अध्ययन रजा ३० दिवसांपर्यंत वाढविता येईल. ३० दिवसांचा वाढीव कालावधी हा असाधारण रजा समजून नियमित करण्यात येईल.

(ग) अध्ययन रजा संपल्यानंतर किंवा वाढीव कालावधीमध्ये कर्मचारी / अधिकारी कंपनीच्या सेवेत रूजू न झाल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल आणि त्याच्याकडून देय रकमांची वसुली करण्यात येईल. आवश्यकतेनुसार देय रकमेच्या वसुलीसाठी कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

(घ) या तरतुदीकरीता प्रकरणपरत्वे संचालक (मासं) / कार्यकारी संचालक (मासं) हे सक्षम अधिकारी असतील.

**१६. अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यापूर्वी रूजू होणे:**

(क) कर्मचाऱ्यास रूजू होण्याची परवानगी देण्यात येईल तथापी तो सविस्तर पदस्थापनेच्या ठिकाणी रूजु होत नाही तोपर्यंत वेतन मिळण्यास पात्र असणार नाही.

(ख) रिक्तपद उपलब्ध नसल्यास तात्पुरत्या स्वरूपात अतिरिक्त पद निर्माण करून कर्मचाऱ्यास रूजू होण्याची परवानगी देण्यात येईल.

(ग) मंजूर करण्यात आलेल्या अध्ययन रजेच्या अंतिम दिनांकास कर्मचारी प्रचलित नियमांनुसार वेतन व भत्ते मिळण्यास आपोआप पात्र होईल.

(घ) अभ्यासक्रमासाठी करण्यात आलेला सर्व खर्च कर्मचाऱ्याकडून वसूल करण्यात येईल. (कंपनीकडून रजा वेतन + अभ्यासक्रम शुल्क + वैद्यकीय विमा खर्च + प्रवासभत्ता/ दैनिक भत्ता + घरभाडे भत्ता + वस्तीगृह शुल्क अथवा घरभाडयाची रक्कम +इतर सर्व खर्च (हमी पत्र खर्चाची रक्कम वगळता) याकरीता केलेला खर्च १२% व्याज दराने वसूल करण्यात येईल.)

(च) अध्ययन रजेचा अभ्यासक्रम अयशस्वीरित्या पूर्ण केल्यास अध्ययन रजेचा कालावधी हा धारणाधिकार रजेमध्ये रूपांतरीत करण्यात येईल आणि अशा प्रकरणी धारणाधिकार रजेच्या अटी लागू होतील.

(छ) अध्ययन रजा मंजूर करणारे अधिकारी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यास सक्षम अधिकारी असतील.

(ज) कर्मचाऱ्यास स्वत:च्या अथवा कुटंबियांच्या अपवादात्मक वैद्यकीय कारणांस्तव अभ्यासक्रम पूर्ण करण्यास बाधा आल्यास सक्षम अधिकारी वरील अट १६(ख) आणि १६(च) शिथिल करू शकतील.

**१७. अध्ययन रजेच्या कालावधीमध्ये मृत्यू/ वैद्यकीय कारणास्तव सेवा समाप्त झाल्यास:**

या प्रकरणी अनुकंपा तत्वावरील योजनेचे प्रचलित नियम संबंधीत कर्मचारी / अधिकारी यांना लागू होतील.

**१८. सेवापुस्तक अद्ययावत करणे/ व सेवापुस्तकाचा ताबा:**

कर्मचारी / अधिकारी अध्ययन रजेवर जाण्यापूर्वीच्या अंतिम आहरण व संवितरण अधिकाऱ्याकडून सेवापुस्तक अद्ययावत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**१९. नियंत्रणाखालील कर्मचारी व संबंधीत कर्मचारी यांचे वार्षिक गोपनीय अहवाल:**

(क) अध्ययन रजेवर जाणारा कर्मचारी / अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी त्याच्या अधिकारात येणारे वार्षिक गोपनीय अहवाल प्रतिवेदन, पुनर्विलोकन, प्रतिस्वाक्षरी आणि स्विकृती अधिकारी यांना सादर करेल.

(ख) अध्ययन रजेच्या कालावधीमध्ये कर्मचारी / अधिकारी त्यांच्या गोपनीय अहवालासाठी पात्र असणार नाहीत.

## • <u>अध्ययन रजा मंजूर करण्यास सक्षम अधिकारी</u>

➢ **नववी अनुसूची : रजा मंजुरी**

**च. अध्ययन रजा:**

| अक्र. | वेतनगट | सक्षम अधिकारी |
|---|---|---|
| १ | सर्व कर्मचारी | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक |

***********

*(टिप: या विनियमांचे मराठीकरण करताना योग्य ती दक्षता घेण्यात आली आहे. तथापि कायदेशिर अर्थ, अन्वयार्थ, मतितार्थ, स्पष्टीकरण इ. साठी इंग्रजी भाषेतील प्रत ग्राहय समजण्यात यावी.)*

प्रपत्र - अ

## अध्ययन रजेसाठी अर्जाचा नमुना

प्रति,

______________________

______________________

______________________

व्दारा - ______________________

म.रा.वि.वि.कं मर्या, ______________________

महोदय,

मी खालील सही करणार, याव्दारे ______________________ या विषयातील अभ्यासक्रमासाठी अध्ययन रजा मिळणेबाबतचा अर्ज करीता आहे.

अभ्यासक्रमाचा तपशिल .

अ) संस्थेचे नांव : ______________________

ब) अभ्यासक्रमाचे नांव : ______________________

क) संस्थेचा पत्ता : ______________________

ड) रजा दि. ________ पासून दि.__________ पर्यंत

(एकुण रजा कालावधी ________ वर्षे ________महिने, सुट्टयांच्या कालावधीसह)

२. रजेसंदर्भात सादर करावयाचा तपशिल

१. अर्जदाराचे नांव : ______________________

२. पदनाम : ______________________

३. भनिनि क्रमांक : ______________________

४. अ) कामाचे ठिकाण : ______________________

ब) उपविभाग : ______________________

क) विभाग : ______________________

ड) मंडळ : ______________________

इ) परिमंडळ : ______________________

५. अ) सेवेत रुजू झाल्याचा दिनांक : ______________________

आ) अर्जाच्या दिनांकास सेवेमध्ये पूर्ण केलेली वर्षे : ______________________

६. अ) जन्मतारीख : ______________________

ब) अर्जाच्या दिनांका रोजी वय : ______ वर्ष ________ महिने ________

क) सेवानिवृत्तीचा दिनांक : ______________________

ड) शिल्लक सेवाकालावधी :______ वर्ष ________ महिने ______

७. अ) मुळवेतन :______________________

ब) वेतनश्रेणी :______________________

## प्रतिज्ञापत्र

मी सादर केलेली वरिल माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी व योग्य आहे. याव्दारे मी विहीत अटींचे पालन करण्यास सहमत असून मी हमी देतो की :

i) कंपनीचे विद्यमान नियम आणि विनियम तसेच याबाबत वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांचे मी पालन करेन.

ii) माझ्याविरूध्द कोणतीही शिस्तभंग कारवाई / लाचलुचपत प्रतिबंध खात्याची /गुन्हेगारी स्वरूपाची कारवाई प्रलंबित नाही.

iii) रजेवर जाण्यापूर्वी कंपनीस देय असलेली रक्कम मी परत करेन.

iv) अध्ययन रजेवरून रूजू झाल्यानंतर एक महिन्याच्या आत मी अभ्यासक्रमाची सामग्री ची एक प्रत संबंधीत नियंत्रण अधिकारी यांना सादर करेन.

आपला विश्वासू,

दिनांक :- सही :-

ठिकाण :- नाव :-

**अर्जदाराने सादर केलेली माहीती तपासली असून ती योग्य आहे.**

**अग्रेषित करणाऱ्या अधिकाऱ्याची सही** ______________________

**अग्रेषित करणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम** ______________________

(कार्यकारी अभियंता पदापेक्षा कमी दर्जाचा नसावा)